Impact Factor: 6.017
ISSN: 2278-9529

# GALAXY

## International Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed e-Journal

Vol.15, Issue- 1 January 2026

**15 Years of Open Access**

Editor-In-Chief: Dr. Vishwanath Bite
Managing Editor: Dr. Madhuri Bite

www.galaxyimrj.com

# मराठा सेवा संघ स्थापनेपूर्वीची पार्श्वभूमी व स्थापना

डॉ. डी. डी. कोल्हेकर
मार्गदर्शक,
संशोधक मार्गदर्शक व इतिहास विभाग प्रमुख,
कै.बाबासाहेब देशमुख गोरठेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उमरी,
तालुका–उमरी, जिल्हा-नांदेड महाराष्ट्र-431807
शिवाजी भगवानराव ताटे
संशोधक.

## प्रस्तावना:

मराठा समाज हा दख्खनच्या पठारावर उगम पावलेला असून त्यांचे मूळ वस्तीस्थान महाराष्ट्राची भूमी आहे. या भूमीमध्ये तो जाती, उपजातीमध्ये विभागला आहे. प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये मराठा समाजाची ओळख कुणबी अथवा कुणबा करून राहणारा (United in groups) अशी होती. सुरुवातीच्या काळात शेती करणारा, पशुपालन करणारा समाज कालांतराने तो शेतकरी आणि योद्धा म्हणून ओळखला जाऊ लागला. तो प्रशासकीय व्यवस्थेसाठी गावाचे कामकाज सांभाळण्यासाठी पाटील झाला. मोठ्या क्षेत्राचे कामकाज सांभाळण्यासाठी देशमुख झाला. पुढे काहीजण स्वतःच्या कर्तबगारीवरती राजे, महाराजे झाले. याचे मूर्तिमंत उदाहरण भोसले घराणे होय. कालांतराने अशा पदामुळे मराठा समाज जाती-उपजाती मध्ये विखुरला गेला. 96 कुळी, 92 कुळी, सप्त कुळी, बारा मासे, अकरा मासे, देशमुख, पाटील, कुणबी एवढेच नाहीतर गडीवरचे, गडी खालचे असा जाती-उपजातीमध्ये

विखुरला गेला. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये छत्रपती शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड महाराजांसारखे संस्थानिक, डॉ. पंजाबराव देशमुख सारखे उच्चशिक्षित अशा काही समाज सुधारकांनी मराठा समाजासोबत बहुजन समाजाची उन्नती व्हावी या उदांत हेतूने पुढे येऊन काही संघटना निर्माण केल्या. मराठेत्तर समाजातील विद्यार्थ्यांना, मराठेत्तर समाजसुधारकांना मदत केली. त्यातील सर्वात मोठे उदाहरण म्हणजे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. त्यासोबतच मराठा समाजातील अज्ञान दूर करण्यासाठी मराठा संघटनाची देखील स्थापना केली. 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत देश स्वतंत्र झाला[1]. आणि भारतामध्ये लोकशाहीची स्थापना झाली. लोकशाही महाराष्ट्रामध्ये पुन्हा मराठा समाज हा वेगवेगळ्या राजकीय पक्षात, वेगवेगळ्या सामाजिक संघटनांमध्ये विखुरला गेला आणि पुन्हा एकमेकांच्या विरोधामध्ये उभा टाकला. सध्याची परिस्थिती पाहता शोषक आणि शोषित अशा पुन्हा दोन वर्गात मराठा समाज विभागला गेला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

संशोधनासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

1. स्वातंत्र्यपूर्वकालीन मराठा संघटनांचा आढावा घेणे.
2. स्वातंत्र्योत्तरकालीन मराठा संघटनांचा आढावा घेणे.
3. मराठा सेवा संघ स्थापनेपूर्वीच्या पार्श्वभूमीचा आढावा घेणे.
4. मराठा सेवा संघ स्थापना व प्रचार-प्रसारवरती प्रकाश टाकणे.

संशोधनाची गृहितके :

संशोधनासाठी खालील गृहितके निश्चित करण्यात आलेली आहेत.

1. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये छ. शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज व अशा काही संस्थानिकांनी व काही उच्चशिक्षित तरुणांनी मराठा संघटना काढून समाजामध्ये जागृती आणण्याचे प्रयत्न केले आहे.
2. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये अण्णासाहेब पाटील, अण्णासाहेब जावळे पाटील, आणि विनायक मेटे सारख्या समाजसुधारकांनी मराठा संघटना काढून मराठा समाजावरील अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य केले आहे.
3. पुरुषोत्तम खेडेकर साहेब व त्यांच्या सहकाऱ्यांनी मराठा सेवा संघाची निर्मिती करून मराठा समाजच नव्हे तर बहुजन समाजाला परिवर्तनवादी, समतावादी, धर्मनिरपेक्षतावादी विचारधारेच्या वाटेला नेण्याचे कार्य केले आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनामध्ये मुलाखत संशोधन पद्धती व सर्वेक्षणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच दुय्यम स्त्रोतांमध्ये अनेक संदर्भग्रंथ, गौरवग्रंथ, मासिके, साप्ताहिके व दैनिके यांचा लिखाणामध्ये वापर करण्यात आला आहे.

संशोधन विषयाची निवड व त्याचे महत्त्व :

"मराठा सेवा संघ स्थापनेपूर्वीची पार्श्वभूमी व स्थापना" हा विषय अत्यंत महत्त्वपूर्ण विषय आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून मराठा समाज सुधारकांनी व वेगवेगळ्या मराठा संघटनांनी मराठा समाजातील हुशार, होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक साह्य (शिष्यवृत्ती) मिळवून दिले. त्यासोबत बहुजन समाजातील हुशार, होतकरू विद्यार्थ्यांना देखील आर्थिक साह्य (शिष्यवृत्ती) मिळवून दिले. अशा समाजसुधारकांचे योगदान काळाच्या पडद्याआड गेलेले प्रकाशात आणून त्यांचा यथोचित गौरव करणे हा उद्देश समोर ठेवून विषयाची निवड केली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठा समाजातील काही प्रमुख संघटना :

डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन :

इ. स. 1882 मध्ये लॉर्ड रिपन भारतातील शिक्षण विषयक प्रगतीची चौकशी करण्यासाठी हंटर कमिशनची स्थापना केली. त्यांच्या उदारमतवादी धोरणामुळे भारतीय समाज सुधारकांमध्ये आशावाद निर्माण झाला. याच वेळी इ. स. 1884 मध्ये विष्णू शास्त्री चिपळूणकर, बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर यांनी पुणे [महाराष्ट्र] येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली[2]. त्याच धर्तीवर मराठा समाजामध्ये देखील शिक्षण विषयी अनास्था आहे हे गंगाराम भाऊ मस्के यांनी ओळखले. ते व्यवसायाने वकील होते आणि त्यांनी मराठा समाजासाठी पहिली सामाजिक संघटना डेक्कन मराठा एज्युकेशन

असोसिएशनची स्थापना इ.स.1885 मध्ये केली. त्यांनी आपल्या असोसिएशनच्या माध्यमातून हुशार व होतकरू मराठा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या रूपाने अर्थसहाय्य करू लागले. या संस्थेला बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराज यांनी त्यावेळेस सुरुवातीला 1200 रुपये आणि त्यानंतर ती रक्कम वाढवून 2400 रु. वार्षिक अनुदान दिले. पुढे संस्थेचे शिक्षण विषयक उद्देश पाहून त्यांनी 1400 रुपये मुलीच्या शिक्षणासाठी वार्षिक अनुदान दिले. तसेच काही वर्षांनी कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांनी 300 रु. वार्षिक अनुदान दिले[3].

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद :

इ.स.1906 मध्ये बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराज हे इंग्लंड वरून भारतात आल्यानंतर त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला होता. त्यावेळेस त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद भरविण्याचे सूचित केले होते त्यानंतर त्यांच्या सूचनेप्रमाणे दि. 30 नोव्हेंबर 1907 रोजी धारवाड येथे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे पहिले अधिवेशन भरविण्यात आले. या अधिवेशनाचे अध्यक्ष खासेराव भगवंतराव जाधव होते व स्वागताध्यक्ष सत्यशोधक समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते भास्करराव विठ्ठुजी जाधव होते. त्यावेळेस अशी 25 अधिवेशने झाली. यामध्ये मोठ्या प्रमाणात मराठा संस्थानिकांचा सहभाग होता यामध्ये कोल्हापूरचे छ. शाहू महाराज व राजाराम महाराज, बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराज, ग्वाल्हेरचे यशवंतराव शिंदे, फलटणचे मालोजीराजे नाईक निंबाळकर, धारचे मुधोजीराव पवार, शेंदूरचे यशवंतराव घोरपडे, देवासचे खासेराव पवार

तर स्वातंत्र्योत्तर काळातील डॉ. पंजाबराव देशमुख, भाऊसाहेब हिरे, बाळासाहेब देसाई, वसंतदादा पाटील, आणि शरद पवार यांनी अखिल भारतीय शिक्षण परिषदेमध्ये जातीने लक्ष दिले. पुढे संघटनेतील राजकीय मंडळींनी राजकीय स्वार्थापायी सर्व जातींसाठी परिषद खुली केली. त्यामुळे संघटनेमध्ये मरगळ आली पुढे मोठ्या प्रमाणात कार्य होऊ शकले नाही. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे शेवटचे अधिवेशन इसवी सन 1998 मध्ये भरले होते. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष शरद पवार व स्वागताध्यक्ष ग्वाल्हेरचे माधवराव शिंदे होते[3].

राष्ट्रीय मराठा संघ :

इ.स. 26 ऑक्टोबर 1917 मध्ये पुणे येथे राष्ट्रीय मराठा संघाची स्थापना झाली. संघटनेचे संस्थापक विठ्ठल रामजी शिंदे होते. ही संघटना स्थापन करण्यामध्ये काशिनाथ ठकुजी जाधव, त्र्यंबक हरी पोटे, नारायण येरवंडे, सखाराम जेधे आदींचा सहभाग होता. या संघटनेचा मुख्य उद्देश मराठा समाजाची राजकीय व सामाजिक परिस्थिती सुधारणे, मराठा समाजाला राष्ट्रीय स्तरावरील राजकीय व सामाजिक जाणीव निर्माण करून देणे हा होता. वि. रा. शिंदे यांनी निवडणुकीत जातीय तत्त्व आणण्याच्या कल्पनेला 1917 पासूनच विरोध दर्शवला होता. त्यांच्या सूचनेनुसार राष्ट्रीय मराठा संघाने दिनांक 16 डिसेंबर 1917 रोजी शनिवार वाड्यापुढील भागात सभा आयोजित केली होती[5].

ऑल इंडिया मराठा लीग :

इ.स. 19 डिसेंबर 1917 रोजी पुणे येथे ऑल इंडिया मराठा लीगची स्थापना बाबुराव

जेधे यांनी केली[6]. ही संघटना बहुजन समाजात राजकीय व सामाजिक जागृती घडून आणण्याचे कार्य केले आहे. बाबुराव जेधे हे ब्राह्मणेत्तर चळवळीचे नेते होते. ते सत्यशोधक समाजात सक्रिय होते. शाहू महाराजांचे सहकारी होते त्यानी जातीय अन्यायाविरुद्ध लढा दिला.

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस :

इ.स. 1920 मध्ये छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर येथे श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसची स्थापना केली[7]. ही संस्था सामाजिक उन्नती आणि सामुदायिक सेवेसाठी प्रसिद्ध आहे. विशेषतः ही संस्था जात किंवा धर्म कोणताही असो गरीब, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांसाठी होती. या संस्थेद्वारे विद्यार्थ्यांची शिक्षणाची, राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था केली जात असे. इ.स. 1960 पासून संस्थेने विविध शाळा आणि महाविद्यालय सुरू केले आहे. या संस्थेला 2003 मध्ये महाराष्ट्र सरकारकडून आदर्श संस्था पुरस्कार मिळाला आहे.

मराठा मंडळ :

इ.स. 30 मार्च 1945 रोजी मराठा मंडळाची स्थापना मुंबई येथे डॉ. टी जी शिरनामे यांच्या अध्यक्षतेखाली 40 लोकांच्या उपस्थितांमध्ये झाली. मराठा मंडळाचे मुख्य उद्दिष्टे मराठा समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीसाठी काम करणारी संघटना होती. तसेच समाजातील गरजू लोकांना मदत करणे, सामाजिक सलोखा राखणे हे महत्त्वाचे कार्य होते. तत्कालीन मुंबई पोलीस चे डेप्युटी कमिशनर नारायणराव कामटे यांच्या

सहकार्यामुळे ग्वाल्हेर संस्थानचे राजे जिवाजीराव शिंदे यांनी अध्यक्षपद स्वीकारले आणि त्यांनी दोन लाख रुपयाची देणगी मिळून दिली. त्यांच्यामुळे जव्हारचे राजे यशवंतराव मुकणे, बडोद्याचे राजे प्रताप सिंह गायकवाड या संस्थानिकांनीही मराठा मंडळास आर्थिक निधी दिला. इ.स. 21 जून 1946 रोजी मराठा मंडळाची पहिली शाळा सोलापूर येथे काढण्यात आली. या शाळेचे अध्यक्ष शिवनेरकार विश्वनाथराव वाबळे हे होते. त्यांनी सोलापूर जिल्ह्यामध्ये एकूण 52 खेड्यांमध्ये प्राथमिक शाळाची स्थापना केली होती[8]. त्यासोबत वस्तीगृह देखील काढले होते.

स्वातंत्र्योत्तर काळातील मराठा समाजातील काही प्रमुख संघटना :

अखिल भारतीय मराठा महासंघ इ.स. 1981 रोजी माथाडी कामगार नेते, कै. आमदार अण्णासाहेब पांडुरंग पाटील यांनी मुंबई येथे अखिल भारतीय मराठा महासंघाची स्थापना केली. त्यापूर्वी 'क्षत्रिय मराठा ज्ञाती समाज' या नावाची जी संस्था होती. ती इ.स. 1981 मध्ये अण्णासाहेब पाटलांनी मुंबई येथे भरलेल्या मेळाव्यामध्ये विसर्जित करून क्षत्रिय मराठा ज्ञाती इमारतीमध्येच अखिल भारतीय मराठा महासंघाचे कार्यालय सुरू केले[9]. या संघटनेचे मुख्य उद्दिष्टे मराठा समाजाची शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक प्रगती व्हावी. त्यासोबतच मराठा समाजाचा एक दबाव गट निर्माण व्हावा. ही मूलभूत संकल्पना होती. अण्णासाहेब पाटील यांनी संपूर्ण महाराष्ट्रात दौरे करून अखिल भारतीय मराठा महासंघ उभा केला. दुर्दैवाने अण्णासाहेब पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी 23 मार्च 1982 रोजी

आत्मबलिदान दिले. त्यानंतर मराठा महासंघामध्ये फूट पडली. मराठा महासंघाचे प्रमुख कार्यकर्ते ॲडवोकेट शशिकांत पवार, विनायकराव मेटे, वरखंडे अशा तीन प्रमुख व्यक्तींचे तीन गट निर्माण झाले आणि अशा प्रकारे मराठा महासंघाची शक्ती विभागल्या गेली.

अखिल भारतीय छावा संघटना :

इ.स. 1990 मध्ये अण्णासाहेब जावळे पाटील यांनी अखिल भारतीय छावा संघटनेची स्थापना केली[10]. अण्णासाहेब जावळे पाटील यांनी मराठवाड्यातील सर्व जिल्हे, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रात दौरे करून संघटना मजबूत केली. या संघटनेची मुख्य उद्दिष्टे मराठा समाजातील विद्यार्थ्यांचे शिक्षण, सरकारी नोकऱ्यांमध्ये मराठा आरक्षण, शेतकरी प्रश्न या मागणीवर जोरदार लक्ष केंद्रित करून सुरुवातीच्या काळात शेकडो सामाजिक प्रश्न या संघटनेने हाताळले ही संघटना महाराष्ट्रातील तरुणांची आक्रमक सामाजिक संघटना म्हणून ओळखली जाते. या संघटनेने सरकारवर, प्रशासनावर दबाव आणण्यासाठी अनेकदा रस्त्यावर निर्देशने केली आहेत.

मराठा सेवा संघाची स्थापना :

इ.स. 22 जुलै 1990 रोजी अकोला येथे पुरुषोत्तम खेडेकर साहेबांनी त्यांच्या विकास या शासकीय बंगल्यावरती राज्यभरातून काही निवडक सुमारे 150 समाज बांधव मित्र-मैत्रिणींना विचारविमर्श करण्यासाठी बोलाविले होते[11]. तिथे त्यांच्यांसमोर खेडेकर साहेबांनी संघटनेचा प्रस्ताव मांडला कि, "मराठा समाजाची प्रभावी संघटना असली पाहिजे. मराठा समाजाची

प्रभावी संघटना नसल्यामुळे समाजावरील अन्याय वाढत आहेत. ही तीव्र जाणीव समाजातील अन्यायग्रस्त आणि अन्याय विरुद्ध लढणाऱ्या आपल्यासारख्या व्यक्तींना जाणवत आहे. तसेच मराठा अधिकाऱ्यांवरती खोटी अट्रॉसिटी दाखल होत आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न आहे. मराठा समाजाचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास साधने असे अनेक प्रश्न आहेत. या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी, न्याय देण्यासाठी, एका प्रभावी संघटनेची आवश्यकता आहे. म्हणून चर्चा झाली आणि नवीन संघटना काढण्याची ही संकल्पना सर्वांनी एकमताने मान्य केले. या संघटनेच्या नावाबद्दल देखील विचारविमर्श करण्यात आला. बरेच तर्कवितर्क लावण्यात आले. काहीच्या मध्ये मराठा हा शब्द जरी व्यापक असला तरी ती एक लहानशी जात आहे असे उपस्थितांपैकी काहींनी व्यक्त केले. तर काहींनी नावात कुणबी असावे किंवा कुणबी मराठा असावे असे काहींनी व्यक्त केले. त्याबाबत पुरुषोत्तम खेडेकर साहेबांनी स्पष्ट असे मत मांडले की, "आता जागतिकीकरणास सुरुवात झाली आहे. मराठा हा शब्द जागतिक किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्ञात आहे. तर कुणबी हा शब्द स्थानिक आणि मर्यादित आहे. तसेच कुणबी मराठा यापेक्षाही मर्यादित आहे[12]. आणि महाराष्ट्रात कुणबी-मराठा, मराठा-कुणबी अशा अनेक गटात मराठा विभागला गेला आहे. या तुलनेत मराठा हा शब्द राष्ट्रगीतात आहे.इतिहासात प्रसिद्ध आहे. शिक्षणात आहे तसेच समाजात प्रतिष्ठित आहे आणि जगभर देखील माहिती आहे अशा प्रकारे या मुद्द्यावरती चर्चा झाल्यानंतर काहींच्या मते बहुजन सेवा संघ असे नामकरण करावे. काहींच्या अशाही सूचना आल्या पण खेडेकर साहेबांनी म्हटले की,

"बहुजन हा शब्द अतिव्यापक आहे. तसेच बहुजन नावाच्या खूप संघटना आहेत. त्यामुळे ते देखील नाव नको अशा पद्धतीने सर्वांनी साधकबाधक चर्चा केल्यानंतर शेवटी मराठा सेवा संघ या नावास सर्वानुमते मान्यता मिळाली. त्यानंतर लगेच त्या ठिकाणी कार्यकारणीची निवड करण्यात आली. ती पुढील प्रमाणे :- अध्यक्ष :- पुरुषोत्तम खेडेकर, उपाध्यक्ष :- वसंतराव बेडसे, सचिव :- निर्मल कुमार देशमुख, कोषाध्यक्ष :- प्रा. डॉ. सुधीर बेनके, सहसचिव :- एस. आर. नाना पाटील, कायदेशीर सल्लागार :- एँडवोकेट हनुमंतराव देशमुख, सदस्य :- प्रा. वसंतराव नागडे, प्रा. संतोषराव बाहेकर, प्रा. अलका लुंगे, जी. के. कुबडे, प्रतापराव चव्हाण, भगवंतराव सातारकर, प्रभाकरराव कांबळे, दामोदरराव भुईभार, रामेश्वर फुंडकर, राम खंडाळे अशा पद्धतीने सतरा लोकांची कार्यकारणी निश्चित करण्यात आली[13]. याच सभेत मराठा सेवा संघाची नियमावली निश्चित करण्यात आली.

पत्रकार परिषदेमध्ये निर्णय जाहीर व प्रचार-प्रसार दौरा :

दि. 23 जुलै 1990 रोजी अकोला येथील सर्किट हाऊस वरती पत्रकार परिषद घेण्यात आली. त्यात अकोला येथील पत्रकारांना बोलावण्यात आले. या पत्रकार परिषदेमध्ये प्रमुख उपस्थिती पुरुषोत्तम खेडेकर, निर्मलकुमार देशमुख, टी टी ठाकरे, डॉ. आर. एन. गोळे, एस. बी. देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी पत्रकारांना पुरुषोत्तम खेडेकर यांनी मराठा सेवा संघ स्थापनेचे जाहीर केले[14]. तसेच सर्वानुमते मराठा सेवा संघाचे ध्येयधोरणे विशद करण्यात आले. मराठा समाजातील सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक व कौटुंबिक पातळीवर जागृत

करण्याचे काम मराठा सेवा संघ करेल अशे आश्वासन दिले. पुढे ॲडव्होकेट हनुमंतराव देशमुख यांनी संघटनेची घटना तयार केली व सर्वानुमते ती घटना मान्य करण्यात आली. धर्मदाय कार्यालय, अकोला येथे रीतसर अर्ज सादर केला गेला. त्यावेळी सहआयुक्त या पदावर माननीय वाय. पी. बेरड हे होते तर कार्यालयीन अधीक्षक, अकोला या पदावरती बाळासाहेब देशमुख हे होते. त्यांनी आवश्यक ती चौकशी करून दि. 31 ऑगस्ट 1990 रोजी सायंकाळी नोंदणी पत्र क्रमांक 3038/F दिले. त्या दिवशी सायंकाळी उशीर झाल्यामुळे 01 सप्टेंबर 1990 रोजी जिजाऊ सभागृह, अकोला येथे आनंदोत्सव साजरा करण्यात आला[14]. अशा पद्धतीने मराठा सेवा संघ या सेवाभावी संस्थेची स्थापना दिनांक 01 सप्टेंबर 1990 रोजी अकोला या शहरात झाली[16]. स्थापनेच्या वेळी मराठा, देशमुख, कुणबी, पाटील, राजपूत, आगरी, भंडारी इत्यादी तत्सम सहाय्य साधर्म्य असणाऱ्या जातीतील, पोटजातीतील शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी नोंदणीकृत संस्थेत काम करणाऱ्या व सेवानिवृत्त झालेल्या व्यक्तीने एकत्र येऊन उर्वरित समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामूहिक कार्य करणे. त्यासाठी समविचारी बहुजन चळवळीचे सहकार्य घेणे व देणे तसेच सामाजिक जबाबदारी व कर्तव्य समजून प्रत्येकाने आपल्या कुवतीनुसार श्रम, वेळ, पैसा, बुद्धी, कौशल्य देणे, प्रबोधन वा तत्सम प्रयत्नातून समाजात एकसंघपणा निर्माण करणे व त्यातून ज्ञानवंत, गुणवंत, धनवंत निकोप समाज निर्माण करणे. असे ढोबळ मानाने मराठा सेवा संघाचे उद्दिष्टे ठरले. त्यानंतर मराठा सेवा संघाची रचना व कार्यकारणीचे स्वरूप ठरविण्यात आले. सभासद फॉर्म, पावती पुस्तके, घटना-

रजिस्टर, देणगी पावत्या छापण्यात आल्या. विशेषतः आचारसंहिता व नियमावली माहिती कॉम्प्युटराइज्ड करण्यात आली. या कॉम्प्युटराइज्ड माहितीनुसार नगर, गाव, संस्था, तालुका, जिल्हा कार्यकारणीचे वर्गीकरण निश्चित करण्यात आले आणि अशा पद्धतीने मराठा सेवा संघाची वाटचाल सुरू झाली.

निष्कर्ष :

जगातील प्राचीन संस्कृती पैकी भारतीय संस्कृतीत सिंधू संस्कृती अति प्राचीन संस्कृती असून जगाला हेवा वाटावा. अशी सुसंस्कृत संस्कृती आहे. त्या संस्कृतीतील अत्यंत न्यायपूर्ण सामाजिक जीवन निर्माण करणारे भारतीय सिंधुजन निऋत्ती, शिव-पार्वती, महाराजा बळी, महावीर वर्धमान, महात्मा गौतम बुद्ध, सम्राट अशोक, जिजाऊ माँसाहेब, छ. शिवाजी महाराज, छ. संभाजी महाराज, छ. राजाराम महाराज, महाराणी ताराराणी, महाराणी येसूबाई यांच्या काळातील वंशातील मराठे सदैव समाजामध्ये कुटुंब प्रमुखाची भूमिका निभावली आहे. महाराष्ट्रामध्ये समाजाला कुटुंब प्रमुखा प्रमाणे सांभाळण्याचे कार्य मराठा समाजाने केले आहे. बहुजन समाजाचे जीवन सुखकर, सुरक्षित, समृद्ध, सजग होण्यासाठी मराठा समाजाने प्राचीन काळापासून आजतागायत मराठा समाज छातीची ढाल करून उभा राहिला. त्यासोबतच भाषा, लोककला, लोकसंगीत, लोकगीत, लोक वाङ्मय, लोकनाट्य, लोकशिक्षण, हस्तकला या कला कौशल्यांना राजाश्रय दिला. निर्मिती क्षमतेला उत्तेजन दिले. कलाकारांकडून मिळणाऱ्या वस्तूंना वस्तू-विनिमय पद्धतीमध्ये जास्त धान्य दिले पण कुणाचे हक्काचे हिसकावून घेतली नाही.

पण विसाव्या शतका अखेरपर्यंत शेकडो एकर वरून मराठा समाज एक-दोन एकर वर आला. मराठा समाजाला खऱ्या अर्थाने मदतीची गरज भासू लागली. हे ओळखून एकोणिसाव्या शतकाअखेर मराठा समाजातील काही राजघराण्यातील समाज सुधारक, सुशिक्षित नोकरी वर्गातील व्यक्तींनी आपापल्या काळात आपापल्या परीने काही सामाजिक संघटना काढल्या. मराठा समाजातील सोबतच बहुजन समाजातील देखील लोकांना मदत केली. स्वातंत्र्योत्तर काळात 01 सप्टेंबर 1990 रोजी मराठा सेवा संघ नावाची संघटना स्थापना झाली. सुरुवातीच्या काळात मराठा समाजावरील अन्याय, अत्याचाराविरुद्ध आवाज उटविण्यासाठी, खोटे ॲट्रॉसिटी गुन्ह्यापासून वाचवण्यासाठी निर्माण केलेली संघटना मराठा समाजातील भोळ्या भाबड्या समाजाला अंधश्रद्धा, रूढी-परंपरातून बाहेर काढण्याचे फार मोठे कार्य केले आहे. आज ती संघटना नसून लोक चळवळ बनली आहे. बहुजन समाजातील उपेक्षित, दुर्लक्षित, वंचित, शोषित समाज घटकांना संघटित करून त्यांचे प्रबोधन करीत त्यांना जागृत करणे, परिवर्तनाच्या प्रवाहात आणणे, अंधश्रद्धा, कालबाह्य रूढी-परंपरातून बाहेर काढणे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रात कुठलाही बदल स्वीकारावयास तयार नसलेल्या समाजाला सुधारावयाचे अवघड काम जणू शिवधनुष्य उचलण्या इतपत कठीण होते. पण मराठा सेवा संघाच्या माध्यमातून पुरुषोत्तम खेडेकरसाहेब व त्यांच्या सहकाऱ्यांनी ते शिवधनुष्य उचलले आणि समाजाला नवी दिशा दिली.

संदर्भग्रंथ सूची :


1. डॉ. शांता कोठेकर, ऑक्टोबर 2014, "आधुनिक भारताचा इतिहास (1947 ते 2000)", प्रकाशन-श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, (पृष्ठ क्रमांक-07)
2. प्रत्यक्ष मुलाखत, कामाजी पवार, नांदेड. दि. 18 जानेवारी 2025, वार शनिवार रोजी.
3. डॉ.रामराव गोळे, 15 ऑगस्ट 2018, "मराठा सेवा संघ इतिहास- खंड 01,प्रकाशन-जिजाऊ सृष्टी, सिंदखेड राजा. (पृष्ठ क्रमांक 14)
4. मराठा मार्ग.
5. प्रत्यक्ष मुलाखत, नेताजी गोरे, तुळजापूर. दि. 29 मार्च 2024, वार शुक्रवार रोजी.
6. प्रत्यक्ष मुलाखत, चंद्रशेखर शिखरे, छत्रपती संभाजीनगर. दि. 23 जून 2025, वार सोमवार रोजी.
7. प्रा. व्ही. बी. पाटील, 2010, "विसाव्या शतकातील महाराष्ट्रामध्ये समाज सुधारणेचा इतिहास", प्रकाशन-के'सागर पब्लिकेशन, पुणे. (पृष्ठ क्रमांक 39)
8. प्रत्यक्ष मुलाखत, गंगाधर बनबरे, पुणे. दि.22 एप्रिल 2024, वार सोमवार रोजी.
9. प्रत्यक्ष मुलाखत, अर्जुन तनपुरे, माजलगाव. दि. 25 नोव्हेंबर 2024, वार सोमवार रोजी.
10. प्रत्यक्ष मुलाखत, सोपान क्षीरसागर, नांदेड. दि. 27 ऑक्टोबर 2025, वार सोमवार रोजी.
11. पुरुषोत्तम खेडेकर, 4 जानेवारी 2022, "शून्याचा ताळमेळ", प्रकाशिका-रेखाताई खेडेकर, मुद्रक-माऊली पेपर्स अँड प्रिंटर्स, छ. संभाजीनगर (औरंगाबाद), (पृष्ठ क्रमांक : 219)

12. प्रत्यक्ष मुलाखत, रेखाताई खेडेकर, चिखली. दि. 18 जुलै 2024, वार गुरुवार रोजी.

13. प्रत्यक्ष मुलाखत, सोमनाथ लडके, नागपूर. दि. 20 एप्रिल 2025 वार रविवार रोजी.

14. प्रत्यक्ष मुलाखत, पुरुषोत्तम खेडेकर, चिखली. दि. 18 जुलै 2024, वार गुरुवार रोजी.

15. शिवधर्म साप्ताहिक.

16. संपादक-बाळासाहेब ठाकरे, सुनील देशमुख, रवींद्र साळवे, 28 एप्रिल 2022,"जनपुरुष-जनमनातील पुरुषोत्तम खेडेकर", माऊली पेपर्स अँड प्रिंटर्स, छ. संभाजीनगर, (औरंगाबाद), (पृष्ठ क्रमांक-109).